
# स्त्रियांचा राजकीय सहभाग

## प्रस्तावना

निसर्गतः जगभर स्त्री-पुरष लोकसंख्येचे प्रमाण सारखे असते. स्त्रियांचे प्रमाण थोडे अधिकच असते. दर हजार पुरुषांमागे किती स्त्रिया या पद्धतीने लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांची तुलनात्मक मोजणी केली जाते. दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण हजारपेक्षा अधिक असेल तर ते नैसर्गीक आणि समाजाच्या दृष्टीने चांगले मानले जाते. ते प्रगत समाजाचे लक्षण मानले जाते.




भारतात २००१ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे ९३३ तर २०११ च्या जनगणनेनुसार ९४३ झाले आहे. शहरी भागात ग्रामीणभागापेक्षा परिस्थिती वाईट आहे. २००१ ते २०११ या दहा वर्षात थोडी सुधारणा झालेली दिसून येते. अनेक गुंतागुंतीच्या कारणांमुळे मुलगी नको ही भूमिका अनेक कुटुंबांनी घेतल्यामुळे आणि उपलब्ध साधनांच्या मदतीने जन्माला येणारे बालक मुलगा आहे की मुलगी हे तपासून, मुलगी असल्यास गर्भपात करून घेण्याचे प्रमाण वाढल्यामुळे स्त्री-पुरुष लोकसंख्येमधील नैसर्गीक समतोल बिघडलेला दिसतो आहे. हरियाणा, पंजाब या राज्यांमध्ये हा आकडा ८०० च्या खाली गेलेला आहे. केरळात १०८४ आणि पुद्दुचेरी मध्ये १०३७ हेच केवळ अपवादात्मक आणि आशादायक आकडे आहेत.

पुरुषसत्ताक आणि पुरुष प्रधान संस्कृतीचे हे परिणाम आहेत. जगात बहुतेक देशांमध्ये आणि विभागात स्त्रियांचे प्रमाण अधिक असले तरी चीन आणि भारतात पुरुषांची संख्या जास्त असल्यामुळे जगात एकूण पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा अधिक आहे अशी नोंद संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या विभागाने २०१५ साली केलेली आहे.

यशस्वी लोकशाही व्यवस्थेसाठी समाजातील सर्व घटकांचा अधिकात अधिक सहभाग असणे गरजेचे असते. परंतु भारतात स्त्रियांचा राजकारणातील सहभाग कमी असल्याचे दिसते. हे अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कारणांमुळे घडलेले आहे. याचा अर्थ आपली व्यवस्था खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्था होत नाही कारण लोकसंख्येचा अर्धा भाग सत्तेपासून वंचित ठेवला गेला आहे किंवा राहिला आहे. भारतात लोकशाही यशस्वी होण्यासाठी महिलांचा राजकारणातील सहभाग वाढविणे, त्यांचे विविध राजकीय संस्थांमधील प्रतिनिधीत्व वाढविणे गरजेचे आहे.

महिलांचा राजकीय सहभाग, प्रतिनिधीत्व आणि त्यांचे सबलीकरण हे एकमेकांशी जोडलेले मुद्दे आहेत. सर्व उद्दीष्टे एकत्रित पणे साध्य केली पाहिजेत. राजकीय सहभाग वाढला नाही तर प्रतिनिधीत्व वाढणार नाही आणि अंतिमतः सबलीकरणाचे उद्दीष्ट साध्य करता येणार नाही. साधरणतः राजकीय सहभागापासून सुरवात होते. विविध आंदोलने, मोर्चे, पक्षाचे कार्य अशाप्रकारच्या राजकीय कृतींमधून सहभागाची सुरवात होते. या प्रकारच्या सहभागातून महिलांना अधिक संधी प्राप्त होत जातात. त्यांना विविध प्रकारचे आणि विविध स्तरावरचे प्रश्न कळत जातात आणि त्यांच्या आकलनानुसार त्या आपले क्षेत्र निश्चित करू शकतात.

## महिला सबलीकरण

प्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या मते स्त्रियांच्या सबलीकरणामुळे केवळ स्त्रियांच्या जीवनात सकारात्मक बदल होतात असे नाही तर पुरुषांच्या आणि लहान मुलांच्या आयुष्यातही ते घडतात. स्त्रियांचे सबलीकरण होण्यासाठी किंवा त्यांना सक्षम बनविण्यासाठी पुरुषांच्या हाती एकवटलेली सत्ता विकेंद्रीत करणे अत्यंत गरजेचे आहे. स्त्रियांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य प्रथमतः वैयक्तिक आणि कौटुंबीक पातळीवर मिळाले पाहिजे. त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. त्या स्वतंत्र होऊन आपल्या पायावर उभ्या राहिल्याशिवाय खऱ्या अर्थाने सबल होणार नाहीत.

महिलांच्या संदर्भातील अन्याय बंधने काढून टाकली पाहिजेत. त्यांना समान दर्जा मिळाला पाहिजे आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रगती करण्याची समान संधी त्यांना मिळाली पाहिजे. भारतीय राज्यघटनेने आणि कायद्याने दिलेले सर्व हक्क उपभोगण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आली पाहिजे. थोडक्यात महिलांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समानता मिळाली पाहिजे. महिला सक्षम झाल्या तर न्याय समाजाची स्थापना होईल जिथे सर्वांना समान संधी, दर्जा आणि वागणुक मिळेल.

महिलांचे सबलीकरण ही काही नवीन गोष्ट नाही. जगात सर्वत्र अनेक कारणांसाठी या मुद्याची चर्चा झाली आहे. आज फरक इतकाच आहे की हा मुद्दा सार्वत्रिक झाला आहे आणि अगदी शेवटच्या माणसापर्यंत निदान हा विचार तरी पोहोचला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या विषयासंबंधी मोठ्याप्रमाणात जागृती निर्माण झाली आहे. कुटुंबाच्या, समाजाच्या, देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकासासाठी महिलांचे सबलीकरण अत्यंत आवश्यक आहे याची जाणीव सर्वांना झाली आहे. याकरीता प्रत्येक देशाने शासकीय, बिगर शासकीय आणि व्यक्तीगत पातळीवर प्रामाणिक प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे याचीही जाणीव सर्वांना झाली आहे.

जगभार महिला त्यांच्यावर लादलेली अन्याय बंधने तोडण्यासाठी लढा देत आहेत. त्यांना समाजातील सत्तेचे असमान वितरण नको आहे. त्यासाठी त्यांनी राजकारणात उतरणे गरजेचे आहे. जिथे धोरणे ठरवली जातात तिथे त्यांचा सहभाग वाढणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानता स्थापन करण्याच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. महिला सबल होण्यासाठी तीन गोष्टी असणे आवश्यक आहे १) स्त्री-पुरुष समानता २) महिलांना त्यांच्या क्षमतांचा विकास करण्याची संधी ३) त्यांचे स्वतःचे प्रतिनिधीत्व करण्याचा आणि स्वयंनिर्णयाचा हक्क त्यांना असला पाहिजे.

प्रत्यक्षात राजकीय क्षेत्रात महिलांचे अस्तित्व अगदीच मर्यादित आहे. त्यामुळे त्यांची परिस्थिती अधिक वाईट होते. संसाधनांचे असमान वितरण होते, संधी मिळत नाहीत, हीतसंबंध दुर्लक्षिले जातात, गरजा, दृष्टीकोन समजून घेतल्या जात नाहीत आणि कशाला प्राधान्य द्यायचे ते त्यांच्याप्रमाणे ठरत नाही.

## भारतीय महिलांच्या राजकीय सहभागाची उत्क्रांती

१९ व्या शतकातील समाज सुधारणा चळवळीमध्ये भारतात महिलांच्या सहभागाची सुरवात झालेली दिसून येते. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी भारतातील स्त्री शिक्षणाची सुरवात केली. त्यांच्या बरोबरीने इतर अनेक समाज सुधारकांनी जातीभेद, पडदा पद्धती, बालविवाह, सती, विधवा विवाहाला होणारा विरोध अशा अन्याय सामाजिक प्रथांच्या विरोधात लढा दिला आणि महिलांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले.

राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांचे शिक्षण आणि सती प्रथा बंदीसाठी विशेष प्रयत्न केले. १८५० च्या दरम्यान विधवा विवाहाला परवानगी मिळावा यासाठी पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले.

त्याचाच परिणाम म्हणून १८५६ मध्ये ब्रिटीश सरकारने त्याप्रकारचा कायदा संमत केला. या कायद्याने विधवा विवाह कायदेशीर मानण्यात येऊ लागला. याच कालतील डॉ. आनंदी गोपाळ जोशी यांचे उदाहरण नोंदविण्यासारखे आहे. त्या एकटीने अमेरिकेत जाऊन वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर झाल्या. १८८६ साली स्वर्ण कुमारी देवी यांनी सखी समिती नावाची स्त्रियांची संघटना स्थापन केली. या सर्व घडामोडींमुळे महिलांच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन मिळाले.

महात्मा गांधीच्या प्रभावामुळे स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात राजकारणात सहभाग घेण्यास सुरवात केली. त्या विविध ठिकाणी मोठ्या संख्येने सत्याग्रहात सामील झाल्या. देश सेविका संघ, नारी सत्याग्रह समिती, महिला राष्ट्रीय संघ अशा अनेक संघटनांची स्थापना झाली.

१९०५ ते १९०८ मध्ये बंगाल मध्ये झालेल्या स्वदेशी चळवळीत अनेक स्त्रियांनी भाग घेतला. बहुतेक महिला स्वातंत्र्य चळवळीत कृतीशील असलेल्या कुटुंबातून आलेल्या होत्या. मध्यम वर्गातील स्त्रियांनी आपले दागिने, पैसे आणि धान्य राष्ट्रीय चळवळीसाठी दिले. त्यांनी विदेशी वस्तूंवरील बहिष्काराच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आणि क्रांतीकारक चळवळीतही त्या सहभागी झाल्या. भगिनी निवेदीता (१८६७ - १९११) या इंग्लंडमधून भारतात आलेल्या स्त्रीने स्वामी विवेकानंदांबरोबर आणि स्वतंत्रपणे अनेक चळवळीत भाग घेतला. मादाम भिकाजी कामा या स्वातंत्र्य चळवळीत मोठी कामगिरी केलेल्या अशाच आणखी एक महिला. त्यांनी आंतरराष्ट्रीय समजवादी काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा द्यावा यासाठी बरेच प्रयत्न केले. त्यांनी 'वंदे मातरम' नावाचे नियतकालिक सुरू केले. मुंबई विद्यापीठ राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख झालेल्या डॉ. उषा मेहता यांनीही स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. कुमुदीनी मित्रा यांनी सुप्रभात नावाचे नियतकालिक सुरु केले.

स्वातंत्र्य चळवळीतील सहभागातूनच महिलांच्या मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न निर्माण झाला. डिसेंबर १९१७ मध्ये अॅनी बेझंट यांनी महिलांच्या मतदानाच्या अधिकारासंदर्भात मॉंट्ग्यु यांची भेट घेतली. यामधूनच वुमेन्स् इंडियन असोसिएशनची स्थापना झाली. त्यामध्ये इतर अनेक महिला नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भाग घेतला. अॅनी बेझंट यांनी होम रूल चळवळी मध्येही भाग घेतला. भारताला ब्रिटीश साम्राज्यांतर्गत ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड सारखी स्वायत्तता मिळावी ही या चळवळीची प्रमुख मागणी होती. लोकमान्य टिळकही या चळवळी सहभागी होते.

सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, अरुणा असफ अली या सर्वांनीही स्वातंत्र्य चळवळीत आणि महिलांच्या हक्कांसाठीच्या चळवळीत भाग घेतला. सरोजिनी नायडू या काँग्रेस पक्षाच्या सदस्य होत्या. काँग्रेसने महिलांच्या मतदानाच्या अधिकारासंबंधी ठराव पास करावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्या काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या. कमलादेवी चटोपाध्याय यांनी सत्याग्रहात भाग घेतला. अरुणा असफ अली मीठाच्या सत्याग्रहात सामील झाल्या आणि त्यासाठी तुरुंगातही गेल्या. चले जाव चळवळीतही त्यांनी भाग घेतला. इन्कलाब नावाचे नियतकालिकाचे त्या संपादन करीत होत्या.

१९२० मध्ये संपत्तीधारक महिलांना मतदानाचा हक्का देण्यात आला. परंतु त्यांना कायदेमंडळात प्रवेश नाकारला गेला. १९३० मध्ये महिलांना कायदेमंडळाच्या निवडणुका लढविण्याचा हक्क मिळाला. १९३० च्या गोलमेज परिषदेत बेगम जहानआरा शहा नवाझ आणि राधाबाई सुब्बारायन यांनी महिलांना कायदेमंडळात ५ टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यान्वये महिलांचा कायदेमंडळातील सहभाग निश्चित झाला. १९३७ च्या प्रांतिक निवडणुकांमध्ये विविध प्रांतांमधून ५६ महिला निवडल्या गेल्या. केंद्रीय कायदेमंडळात ३० महिलांची निवड झाली.

स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या या सहभागामुळेच भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा आणि महिलांच्या हक्कांचा समावेश करण्यात आला.

## स्वातंत्र्यानंतरचा महिलांचा राजकारणातील सहभाग

स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्त्रियांनी मोठे योगदान दिले, परंतु त्यांचा हा सहभाग कायम ठेवण्यासाठी काही विशेष प्रयत्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतर करण्यात आले नाहीत. प्राधान्य पुरुषांनाचा मिळाले. अगदी एखाद्या कुटुंबात कर्ता पुरुष नसेल तर सत्ता कुटुंबात रहावी या उद्देशाने तात्पुरते स्त्रीला प्रतिनिधीत्व दिले जाते.

बऱ्याच वेळा महिला आरक्षणामुळे पुरुष नगरसेवकाला आपले पद गमवावे लागते. अशावेळी तो नगरसेवक आपल्याच नात्यातल्या स्त्रीला त्याजागी निवडणुक लढवायला लावून सत्ता आपल्या घरात ठेवण्याचा प्रयत्न करतो. ती स्त्री निवडून आल्यास केवळ औपचारिक दृष्टीने जिथे गरजेचे आहे तिथे ती जाते एरवी सर्व कामकाज अथवा निर्णय प्रक्रिया जुना पुरुष प्रतिनिधीच पाहतो.

घटनाकारांनी चांगल्या उद्देशाने कायदे केले परंतु प्रत्यक्षात तो लागू करणे या बाबतीत तरी कठीण आहे.

## घटनात्मक तरतूदी


भारतीय राज्यघटना समानतेच्या तत्त्वावर आधारित आहे. घटनेप्रमाणे कायद्यासमोर सर्व समान असतात आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळते. घटनेने मूलभूत हक्क दिले आहेत. शिवाय धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान यापैकी कुठल्याही आधारावर भेदभाव केला जाणार नाही याची खात्री दिली आहे. स्त्रियांच्या बाबतीत तरी हे हक्क बऱ्याच अंशी कागदावरच राहीले आहेत. त्यामुळे स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, नागरी आणि राजकीय हक्क मिळालेले नाहीत. राजकीय क्षेत्रात त्यांचे फारसे अस्तित्व नसल्यामुळे स्त्रिया समान हक्क प्राप्त करू शकलेल्या नाहीत.

### *कल्याणकारी योजनांपासून सबलीकरणापर्यंत*


स्वातंत्र्यानंतर केंद्र आणि राज्यसरकारांनी दुर्बल घटकांसाठी आणि महिलांसाठी कल्याणकारी योजना जाहीर केल्या आणि राबवल्या. महिलांसाठीच्या कार्यक्रमात आरोग्य, बाळंतपणातील आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यावर भर देण्यात आला. दोन दशकांनंतरही या कार्यक्रमा मुळे महिलांच्या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. त्यामुळे सरकारला धोरण बदलावे लागले. १९९० पासून कल्याणकारी योजनांऐवजी सबलीकरणावर आणि सक्षमीकरणावर भर देण्यात आला. आता महिलांना धोरण तयार करण्याच्या आणि निर्णय प्रक्रियेत सामील करून घेण्यावर अधिक भर देण्यात येत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम क्र. २४३ डी प्रमाणे सर्व पंचायती राज संस्थांमध्ये महिलांना एक तृतीयांश प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली आहे. आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, केरळ, महाराष्ट्र, ओरिसा, राजस्थान, त्रिपुरा, उत्तराखंड या राज्यांनी ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंचांच्या जागांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण घोषित केले आहे. १९९३ मध्ये ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने अनुक्रमे ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या नवीन तरतूदी करण्यात आल्या. त्यामुळे राजकारणातील महिलांचा सहभाग प्रभावीपणे वाढला आहे. सुरवातीच्या काळात अविश्वासाने सहभागी होणाऱ्या स्त्रिया आता पूर्ण आत्मविश्वासाने राजकारणात सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेताना दिसत आहेत.

## महिलांचा राजकारणातील सहभाग – काही आकडेवारी





वरील आलेखात सतरा देशांच्या यादीत भारताचा क्रमांक तेरावा लागलेला दिसतो आहे.  रवांडा सारख्या आफ्रिकेतील मागास देशात महिलांना चांगले प्रतिनिधीत्व मिळालेले दिसते.  रवांडाच्या सरकारवर महिलांचे वर्चस्व आहे.  तिथल्या काही महिला नेत्यांनी महत्वाचा मुद्दा मांडला आहे – महिलांचे प्रश्न खऱ्या अर्थाने महिलांनाच कळू शकतात.



वॉशिंग्टन पोस्ट – गेटी इमेजेस – रवांडामधील महिलांच्या नेतृत्वाखालचे सरकार


**महिलांचे केंद्रीय मंत्रीमंडळामधील नगण्य स्थान –**

१९८५ पासून २०१४ पर्यंत सर्वाधिक महिला कॅबीनेट मंत्र्यांची संख्या = ५





**लोकसभेतील स्त्री खासदारांचे प्रमाण**

-अकरा-बारा टक्क्यांच्या वर जाऊ शकलेले नाही.



## आणखी एक बोलकी आकडेवारी...



## काही नावाजलेल्या महिलांविषयी...

| प्रथम महिला | नाव | संबंधीत माहिती |
|---|---|---|
| मंत्री | विजयालक्ष्मी पंडीत | १९३७ च्या संयुक्त प्रांताच्या मंत्रिमंडळात स्थानिक शासन आणि आरोग्य मंत्री |
| राजदूत | विजयालक्ष्मी पंडीत | १९४७-४९ या काळात सोव्हिएट रशिया मधील भारताच्या राजदूत |
| राज्यपाल | सरोजिनी नायडू | १९४९ – उत्तर प्रदेश |
| केंद्रीय कॅबिनेट मंत्री | राजकुमारी अमृत कौर | १९५२ – पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पहिल्या मंत्रीमंडळातील आरोग्य मंत्री |
| मुख्यमंत्री | सुचेता कृपलानी | १९६३-६७ उत्तर प्रदेश |
| पंतप्रधान | इंदिरा गांधी | १९६६-७७ , १९८०-८४ |
| सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश | एम. फातिमा बीबी | १९८९ |
| उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश | लीला सेठ | १९९१ – हिमाचल प्रदेश |
| राष्ट्रपती | प्रतिभा पाटील | २००७-२०१२ |
| लोकसभा अध्यक्ष | मीरा कुमार | २००९-२०१४ |

## संसद आणि राज्य विधीमंडळातील महिला आरक्षण

७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरूस्तीचा आपण आधी उल्लेख केला. त्याद्वारे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३% आरक्षण मिळाले. काही राज्यांनी ते ५० टक्क्यांपर्यंत वाढविले. त्यानंतर राज्याच्या आणि केंद्राच्या विधीमंडळांमध्ये महिलांना आरक्षण मिळणे क्रमप्राप्त होते. परंतु आजपर्यंत प्रत्यक्षात तसे झालेले नाही. कॉंग्रेस सरकारने याबाबतची दुरुस्ती घटनेत करणारे विधेयक संसदेत मांडले परंतु ते आजतागायत संमत होऊ शकलेले नाही. काही पक्षांचा त्याला विरोध आहे. मोठ्या संघर्षानंतर राज्यसभेमध्ये ते मंजूर झाले. या विधेयकाला किमान निम्म्या राज्यांच्या विधीमंडळांच्या मान्यतेची गरज आहे. त्या प्रक्रियेत बराच वेळ जाईल.

राजकीय पक्षांनी उमेदवारांची निवड करताना ३३ टक्के महिला उमेदवार निवडाव्यात असे कायद्याने बंधनकारक करावे असेही सुचवले जाते. यासाठी लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१मध्ये बदल करावे लागतील. या सर्व तरतूदींमुळे महिलांचा सहभाग कितपत वाढेल याविषयी शंकाच आहे.

## राजकारणातील महिलांच्या अल्प सहभागाची कारणे

सामाजिक आणि आर्थिक विकास, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती, राजकीय व्यवस्थेचे स्वरुप अशा अनेक घटकांवर महिलांचा राजकीय सहभाग अवलंबून असतो. 'महिला' हा एकसंध गट नाही. जात, वर्ग, वांशिक भेद, धर्म, शिक्षण, सांस्कृतिक पार्श्वभूमी इत्यादी आधारांवर त्यांच्या मध्ये वेगवेगळे गट तयार होतात. काही वेळा त्यांचे हीतसंबंध परस्पर विरोधीही असू शकतात. महिलांच्या एका गटाला जाणवणारे अडथळे दुसऱ्या गटाला तेवढ्या तीव्रतेने जाणवतीलच असे नाही. प्रत्येक गटाचे प्रश्न वेगळे. उदा. खेड्यातील गरीब महिलांना आर्थिक प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटू शकतात तर शहरातील तुलनेने संपन्न महिलांच्या गटाला पुरुष प्रधान कुटुंबव्यवस्थेची चौकट अधिक जाचक वाटत असेल.

## राजकीय अडथळे

### *पुरुष प्रधान व्यवस्था*

राजकारण आणि राजकीय जीवनपद्धती पुरुषांच्या मूल्यांप्रमाणे ठरवलेली आहे. राजकारणावर पुरुषी जीवनपद्धतीची छाप आहे. उदा. राजकारणात "जिंकणारे आणि हरणारे" आणि "स्पर्धा आणि संघर्ष" असतो शिस्तबद्ध सहकार्य किंवा समन्वय नसतो. यामुळे महिला एकतर राजकारण नाकारतात किंवा पुरुषी पद्धतीचे राजकारण त्यांना नको असते. महिलांच्या दृष्टीने सामाजिक सुरक्षा, राष्ट्रीय आरोग्य आणि मुलांच्या समस्या हे निकडीचे प्रश्न असतात तर पुरुषांच्या दृष्टीने ते क्षुल्लक किंवा कमीतकमी प्राधान्याचे विषय असतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा यांच्या पत्नी मिचेल ओबामा यांनी अमेरिकेला भेडसावणारा

स्त्री-पुरुषांच्या वाढीव वजनाचा प्रश्न सोडविण्यासाठी धावण्याची आणि व्यायामाची गोडी लोकांना लागावी यासाठी 'लेट्स मूव्ह' सारखे स्वतंत्र कार्यक्रम राबवून बरेच प्रयत्न केले. इराक-अफगाणिस्तान आणि सिरिया पेक्षा किंवा टॉम हॉक क्रूझ क्षेपणास्त्रांपेक्षा त्यांना हे महत्त्वाचे वाटले.

संसदेच्या कार्यपद्धीतीकडे पाहिल्यास कुटुंबापासून दूर राहून बराच वेळ देणे आवश्यक आहे हे सहज लक्षात येते. त्यापलिकडे खासदार आणि आमदारांना पक्षाचे काम करावे लागते, लोकांना भेटावे लागते, विविध समित्यांचे काम असते. माध्यमांना वेळ द्यावा लागतो, कार्यकर्त्यांना सांभाळावे लागते, चाहत्यांसाठी वेळ काढावा लागतो. त्यांना खाजगी जीवन फारसे शिल्लक राहत नाही. महिलांना हे सर्व शक्य नाही कारण आधीच त्यांच्यावर कुटुंबाच्या जबाबदारीचा प्रचंड बोजा असतो. आई, बायको, बहीण या सगळ्या भूमिका त्यांना निभावून न्यायच्या असतात.

### *राजकीय पक्षांची भूमिका*

राजकीय पक्षांनी एका बाजूला स्त्रीमुक्तीची घोषणाबाजी त्वेषाने चालू ठेवली असली तरी प्रत्यक्षात स्त्रियांना फारसे प्रतिनिधीत्व दिलेले नाही. महिलांकडे नेतृत्व असलेल्या पक्षांबद्दलही हे खरे आहे – उदा. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आण्णा द्रमुक इत्यादी. अलिकडे महिला प्रचारात बऱ्यापैकी दिसतात परंतु त्यांना संघटनेमध्ये फारसे स्थान मिळत नाही. त्यांना उमेदवारी दिली जात नाही. आर्थिक मदत केली जात नाही. योग्य मार्गदर्शन दिले जात नाही. मंत्री म्हणून नियुक्ती झाली तरी किरकोळ खाती त्यांच्याकडे दिली जातात. राजकीय पक्ष हे लोकशाही व्यवस्थेचे भक्कम आधार आहेत परंतु तेच महिलांना न्याय देण्यास फारसे उत्सुक नसलेले दिसतात.

### *निवडणुक पद्धती*

एक प्रतिनिधी मतदारसंघांऐवजी बहुप्रतिनिधी मतदारसंघांची पद्धत अवलंबल्यास म्हणजेच एका मतदारसंघातून दोन किंवा तीन प्रतिनिधींची निवड केल्यास महिलांना अधिक प्रतिनिधीत्व मिळू शकते. परंतु ते इतर काही कारणांसाठी प्रत्यक्षात आणणे अवघड आहे. फिनलंड, डेन्मार्क, स्वीडन सारख्या छोट्या, श्रीमंत, आणि बहुसंख्य उच्चशिक्षित लोक राहत असलेल्या देशांमध्ये ते सहज शक्य आहे.

### *भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण*

राजकारण हा अलिकडच्या काळात अत्यंत खर्चिक व्यवसाय झाला आहे. निवडणुक आयोगाने कडक नियम करूनही परिस्थितीमध्ये फारसा बदल झालेला नाही. ज्यांच्या कडे पैसा आणि सत्ता आहे, म्हणजे निवडून येण्याची क्षमता आहे त्यांच्याकडेच राजकीय पक्षांच जास्त प्रमाणात ओढा असतो. राजकीय पक्षाच्या रोजच्या कामकाजासाठी सुद्धा प्रचंड पैसा लागतो. तो मिळवण्यासाठी सर्व उपलब्ध मार्गांचा अवलंब केला जातो. त्यामुळे राजकारणात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरु झाला आहे. भ्रष्टाचाराचे व्यवस्थित नियमन आणि संस्थीकरण केले जाते. पद्धती ठरवून दिल्या जातात, पायंडे पाडले जातात, पर्यायी व्यवस्था उभ्या केल्या जातात. भारतात पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. त्यावरून या प्रश्नाचे गांभीर्य आणि तीव्रता लक्षात येईल. पैशा शिवाय गुंडगिरीलाही महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकारण्यांचे स्थानिक गुंडांपासून आंतरराष्ट्रीय माफिया टोळ्यांपर्यंत संबंध आहेत असा आरोप बऱ्याच वेळा केला जातो. बरेच गुन्हेगार किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक राजकारणात आले आहेत. काही अपवाद सोडल्यास महिलांना या व्यवस्थेचे भाग होणे किंवा या व्यवस्थेशी जुळवून घेणे किंवा या व्यवस्थेचा सामना करणे अतिशय कठीण वाटते.

### *प्रशासनाचा दृष्टीकोन*

प्रशासनाचा दृष्टीकोन पारंपारिक आहे. तो बदलणेही खूप कठीण आहे. अर्थात इथेही सन्मानीय अपवाद आहेतच. परंतु ते सोडल्यास प्रशासनाचा साधारणतः महिलांना सहकार्य करण्याचा दृष्टीकोन नसतो. त्याला कंटाळून काही महिला राजकारण सोडून देण्याची किंवा सहभाग कमी करण्याची शक्यता असते.


## सामाजिक आणि आर्थिक अडथळे

### *तिहेरी जबाबदारी*

कुटुंब, नोकरी-व्यवसाय आणि राजकारण अशी तिहेरी जबाबदारी महिलांवर येऊन पडते. याला पर्याय काहीच नाही. घरी किंवा कामाच्या ठिकाणी कोणीही फारशी तडजोड करायला तयार होत नाही. विशेषतः गरीब आणि ग्रामीण स्त्रियांचा हा प्रश्न मोठा आहे. पाणी भरणे, लाकूडफाटा गोळा करणे, गुरे चारणे, मुलांचा संभाळ अशा वेळखाऊ कामांमुळे त्यांना राजकीय सहभागासाठी वेळ देणे शक्य होत नाही. ग्रामीण भागातील बऱ्याच स्त्रिया असंघटीत क्षेत्रात काम करीत असल्यामुळे त्यांचे प्रश्न अधिक जटील आहेत. शहरी महिलांनाही काही प्रमाणात या समस्यांना सामोरे जावे लागतेच. त्यामुळे राजकारण त्यांच्यासाठी शेवटचा विषय ठरतो.

### *निरक्षरता*

जगातील सर्वात जास्त निरक्षर स्त्रिया भारतात आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार २४ टक्के पुरुष तर ४६ टक्के स्त्रिया निरक्षर होत्या. अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये हे प्रमाण अनुक्रमे ७६ आणि ८१ टक्के इतके म्हणजेच अधिक वाईट आहे. त्यामुळे स्त्रियांना योग्य प्रमाणात माहिती मिळत नाही. त्या माहितीसाठी पुरुषांवर अवलंबून राहतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमकुवत होतो. २००१ आणि २०११ च्या जनगणनेमधील ग्रामीण आणि शहरी स्त्री आणि पुरुषांबद्दलची ही आकडेवारी पहाः-




### *औपचारिक आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव*

अलिकडे राजकारण हा पूर्णवेळ विशेषज्ञांचा व्यवसाय झाला आहे. राजकारणात यशस्वी होण्यासाठी किमान माहिती आणि कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक बनले आहे. परंतु या प्रकारचे प्रशिक्षण सहज उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्त्रिया मागे पडतात.

## मानसिक आणि सांस्कृतिक अडथळे

भारतासहीत अनेक देशांमध्ये आजही स्त्रियांनी केवळ चूल आणि मूल या गोष्टींकडे लक्ष द्यावे. त्यांनी इतर कोणत्याही बाबीमध्ये लक्ष घालू नये अशा संकल्पना रूढ आहेत. त्यामुळेच स्त्रियांना राजकारणात पडण्यासाठी आवश्यक तो आत्मविश्वास प्राप्त होत नाही. पुरुष प्रधान व्यवस्थेमुळे अनुभव विश्व मुळातच मर्यादीत आणि मनात पाप-पुण्याच्या संकल्पना ठासून भरलेल्या त्यामुळे स्त्रिया राजकारणाला 'वाईट', 'घाणेरडे' ठरवतात.

## परिस्थिती सुधारण्याचे उपाय

वर उल्लेखिलेल्या सर्व अडथळ्यांवर मात करुनही राजकारणात सहभागी होणाऱ्या, सखोल ज्ञान मिळवून आपली आणि देशाची प्रगती करणाऱ्या अनेक महिला भारतात आजही कार्यरत आहेत. भारतात परंपरेने स्त्रियांना किती हीन दर्जाची वागणूक मिळते हे लक्षात घेऊन स्त्रियांच्या या प्रगती कडे पाहिले पाहिजे. मायावती, सुषमा स्वराज, जयललिता, ममता बॅनर्जी, वृंदा करात, रेणुका चौधरी, उमा भारती, अंबिका सोनी, निर्मला सितारामन ही सर्व पक्षांमधील काही उल्लेखनिय नावे.

## संदर्भ

1) https://www.washingtonpost.com/news/worldviews/wp/2015/08/19/see-where-women-outnumber-men-around-the-world-and-why/ - जागतिक लोकसंख्येविषयीची संयुक्त राष्ट्रांनी दिलेली माहिती.

2) https://www.theguardian.com/society/2014/jul/01/lessons-rwanda-female-run-institutions-mps - रवांडा मधील महिलांची बहुसंख्या असलेल्या कायदेमंडळाविषयी लंडनच्या दी गार्डीयन मधील लेख
3) http://www.letsmove.gov/ - अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ओबामा यांच्या पत्नी मिचेल ओबामा यांनी मुलांच्या आरोग्यवर्धनासाठी चालवलेला कार्यक्रम.

### प्रश्न

1) भारतातील महिलांचा राजकारणातील सहभाग कसा वाढत गेला त्याची सविस्तर चर्चा करा.
2) आकडेवारीच्या सहाय्याने महिलांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण करा.
3) महिलांच्या राजकारणातील अत्यल्प सहभागाची कारणे कोणती आहेत ?